# FIRST SEMESTER MODEL QUESTION PAPER 2024-25

Std: IX — Sub: Marathi

Marks: 40 — Duration: 2 hrs

१. रमाला __________ गोष्टीचा गर्व होता.

A हुशारीचा

B श्रीमंतीचा

C घूराचा

D सौदर्याचा

२. लोहिया मडगावच्या __________ हॉटेलमध्ये येऊन राहिले होते.

A सनग्रेस

B स्वागत

C रिपब्लिक

D कार्तिकी

३. लहानपणी लेखकाच्या घरची आर्थिक स्थिती __________ .

A मजबूत होती

B हलाखीची होती

C मध्यम होती

D गरिबीची होती

४. अभ्यासाच्या नावाखाली बंड्या __________ काढत बसायचा.

A चित्रे

B रेषा

C वर्तुळ

D त्रिकोण

५. गुरूजींची पत्रे __________ वारसा ठरणार आहेत.

A रामाचा

B आजोबाचा

C बाळगोपाळांचा

D राजाचा

६. मेणबत्तीच्या __________ प्रकाशात वाचीत बसणे लेखकाला आवडते.

A शितल

B उग्र

C उष्ण

D थंड

७. आईने जरीची वेलबुट्टी असलेली __________ टोपी आणली.

A मखमली

B रेशमी

C सोन्याची

D मोत्याची

८. सुंदर घर ह्या पाठाची लेखिका __________

A ना. ग. गोरे गोरे

B अनंती काणेकर

C जयवंती दळवी

D डॉ लीला दीक्षित

९. कृतज्ञता पत्र या पाठाचे लेखक सांगा __________

A शांताराम जाधव

B ना. ग. गोरे

C रविंद्र पिंगे

D य. गो. जोशी

१०. अनंत काणेकर __________पाठाचे लेखक आहे.

A आजीचा कौल

B माऊ

C त्यांची आठवण ठेवा

D दोन मेणबत्या

११. डॉ ललिता गुप्ते कोणत्या पाठाची लेखिका आहे?

A १८ जून १९४६

B अभ्यास करतोय मा

C ठोकळ्याचे चित्र

D जलसंवर्धन

१२. शुध्द ज्याचा भाव झाला। दूरी नाही __________ ।

A माणूस त्याला

B देव त्याला

C राक्षस त्याला

D संत त्याला

१३. तुकाराम महाराजांना __________ अमंगळ वाटते.

A फुटाफुट करणे

B बोलाबाली करणे

C भेदाभेद करणे

D सराव करणे

१४. बघू बंगला या मुग्यांचा __________ ऐकु या त्या भुंग्याचा

A सूर

B ताल

C राग

D गाण

१५. ज्याच्यामधी नाही भाव त्याले __________ म्हणू नही।

A भजन

B किर्तन

C प्रार्थना

D भक्ती

१६. कोण्याही जीवाचा न घडो __________

A राग

B लळा

C मत्सर

D द्वेष

१७. कवीने बिनभिंतीची शाळा __________ म्हटले आहे.

A देवाला

B निर्सगाला

C माणसाला

D पृथ्वीला

१८. वारा ________ वेळी अंधाराचे दोहे गात असतो.

A दसऱ्याच्या

B दिवाळीच्या

C चतूर्थिच्या

D होळीच्या

१९. पाण्यामध्ये ________ भिजवूनी थेंब दोन घालू।

A चंद्र

B सूर्य

C तारे

D नक्षत्र

२०. नाटक या शब्दाचे विशेषण ________

A नाटककार

B नाटकी

C नाटकवान

D लोभी

२१. विशेषण ओळखा

विसर –

A विसखान

B विसराळू

C मायाळू

D दयाळू

२२. खालील पर्यायातून ज्ञान शब्दाचे विशेषण ओळखा.

A ज्ञानसर

B लोभी

C ज्ञानी

D ज्ञानवान

२३. माणूस ह्या शब्दाचे भाववाचक नाम ________

A आपुलकी

B माणुसकी

C गावकी

D वडीलकी

२४. खालील शब्दापासून भाववाचक नाम ओळखून लिहा

A शांत

B शांतता

C नम्र

D क्रुर

२५. खालील पर्यायातून वेडा या शब्दाचे भाववाचक नाम ओळखा.

A वेडसर

B उष्णता

C वेडेपणा

D हुशारी

२६. काकी या शब्दाते पुल्लिंग ____________ आहेत

A मामा

B काका

C राजा

D भाऊ

२७. लिंग बदलून लिहा

मुलगा –____________

A युवती

B तरूणी

C मुलगी

D कुमारी

२८. घोडा ह्या शब्दाचे स्त्रीलिंग ____________ आहेत.

A लोमडी

B कोंबडी

C घोडी

D रेडी

२९. अनेकवचन ओळखा.

वही –____________

A गाड्या

B काढ्या

C वह्या

D माड्या

३०. झाड या शब्दाचे अनेकवचन ________

A फूले

B मूळे

C रोपे

D झाडे

३१. नदी या शब्दाचे अनेकवाचन खालील पर्यायातून ओळखा

A ओळ्या

B नद्या

C खिडक्या

D पिशव्या

३२. विरूध्दार्थी शब्द ओळखा

सत्य x ________

A खोटे

B असत्य

C अधर्म

D अशांत

३३. नफा या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द ________

A उतार

B वाईट

C तोटा

D रडणे

३४. विरूध्दार्थी शब्द निवडा.

अंधार x ________

A सगुण

B ऊजेड

C गरम

D दूर

३५. डोळे या शब्दाचा समानार्थी शब्द ________ आहेत

A आसू

B नयन

C जंगल

D रवि

३६. समानार्थी शब्द ओळखा.

पाणी – ________

A भूमी

B जल

C मेध

D सुत

३७. समानार्थी शब्द निवडा

हात –________

A सखा

B कर

C तरूण

D तोंड

३८. डोक्यात प्रकाश पडणे या वाक्यप्रचाराचा अर्थ ________ आहे.

A समजणे

B अर्थ कळणे

C उजाडणे

D दाखवणे

३९. योग्य पर्याय निवडून नाम कमावणे या वाक्यप्रचाराचा अर्थ लिहा

A जोरात पुढे चालणे

B ढकलणे

C आनंद होणे

D प्रसिध्दि मिळविणे

४०. हुजत घालणे या वाक्यप्रचाराचा अर्थ ________ आहेत.

A भांडण मिटविणे

B वाद घालणे

C मोठ्याने बोलणे

D जोराने बोलणे

# FIRST SEMESTER MODEL QUESTION PAPER 2024-25

Std: IX (Subjective paper) Sub: Marathi

Marks: 40 Duration: 2 hrs

खालीलपैकी कोणत्याही सात प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा (7)

41. दगडाच्या परळामध्ये पाणी का भरून ठेवले होते?
42. मानवांचे मूलभूत हक्क कोणते?
43. लेखक व त्याचा मित्रांनी कोणत्या संघाची स्थापना केली?
44. बंड्याला कोणता खेळ खेळायचा आहे?
45. गूरूजींच्या बेचाळीस पत्रांना कशाची उपमा दिली आहे?
46. दूसरी मेणबत्ती निरूपयोगी का झाली होती ?
47. बागाईतकर मास्तरांनी कोटाची बटणे को सोडली?
48. रमाने स्पर्धेसाठी सुरभीचे नाव का दिले?
49. लेखकाला दूध घालण्याचा मोबदला म्हणून काय मिळत असे?

खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन वाक्यांत लिहा. (4)

50. लेखक सकाळचा वेळ कोणत्या कामात घालवत असे?
51. या राष्ट्राचे नंदनवन केव्हा बनू शकेल ?
52. ‘ मी भाषण करायला आलो आहे ’ या डॉ. लोहियांच्या वाक्यावर मिरांद काय म्हणाला?

खालीलपैकी कोणत्याही सहा प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (6)

53. योगी काय सहन करतो?
54. सर्वेश्वर पूजनाचे वर्म कोणते?
55. लेक कोणाला म्हणू नये, अस बहिणाबाई सांगतात?
56. बेडकीचे लेकरू कसे आहे?
57. कशाचा भारा घेऊन आई चालत असते?
58. उंदीरमामाचा खजिना कोठे आहे ?
59. बाजारात कोणती वस्तू विकत मिळत नाही?
60. कवी कोणाबरोबर सामना करणार आहे?

खालील वाक्याचा काळ ओळखून लिहा (1)

61. लाकुडतोड्याने झाड कापले.

62. खालील वाक्यातील क्रियापद ओळखून लिहा (1)
रामू आंबा खातो.

63. खालील वाक्यातील नाम ओळखून लिहा (1)
लता भावगीत गात होती.

64. खालील वाक्यातील सर्वनाम ओळखून लिहा (1)
त्याने जेवण केल.

65. खालील वाक्यातील विशेषण ओळखून लिहा. (1)
तानाजी शूर सरदार होता.

66. खाली दिलेल्या शब्दांचे नामांच्या विविध प्रकारात वर्गीकरण करून खालील तक्त्यात लिहा. (4)

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचक नाम |
|---|---|---|
| | | |
| | | |

पुढील वाक्यातील अधोरेखीत अव्ययांच्या जाती ओळखून लिहा. (4)

67. वारा आला आणि पाऊस गेला.

68. शाबास! तुझं हे चित्र फार सुंदर आहे !

69 हॉटेला समोर थिएटर आहे.

70. जयेश जलद धावतो

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (5)

मदर तेरेसाचा जन्म युगोस्लाव्हिया देशात बेलग्रेडपासून काहीशी दूर अशा स्कोपये या गांवी झाला. तिची आई एका कष्टकरी कुटुंबातील होती. वडिल एक छोटेसे दूकानदार होते. तेरेसाचे नांव तिच्या आईवडिलानी मोठ्या कौतुकाने अग्रेस ठेवले होते. अग्रेस केवळ आपल्या आईवडिलांचीच नव्हे तर इतर कुटुंबीयाचीही अतिशय लाडकी होती. तिला लहानपणी आपल्या आईला घरकामात टापटिपीने मदत करण्याची भारी हौस. वडील दूकानदार म्हणजे

हिशेबी व्यवहारी. अग्नेस वडलाप्रमाणे नफा नुकसान पहात असे. कुटुंब बेताचे, मिळकत बेताची, श्रीमंती नाही, तशी गरिबी पण नाही मात्र प्रेम-सुख समाधान यांच्या कुटुंबात नांदत असे.

प्रश्न

71 मदर तेरेसाचा जन्म कोणत्या देशातील कोणत्या गावात झाला?

72. मदर तेरेसाचे वडिल कोण होते?

73. तेरेसाचे नाव तिच्या आईवडिलानी काय ठेवले होते?

74 लहानपणी ॲग्नेसला कोणत्या गोष्टीची हौस होती?

75 तेरेसाच्या कुटुंबात काय नांदत असे?

खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. 5

झाडे कोणाला आवडत नाहीत? मुकी झाडे सुख-दूःखात माणसाला साथ करतात. बागेतल्या हंगामी झाडांचा लळा मला फारसा लागत नाही.पण वृक्षाच्या ठायी ठायी लागतो. वृक्षासारखा मानवी जीवनाचा साक्षी दूसरा कुणी नाही. झाडे सारखी तुम्हाला न्याहाळीत असतात.झाडाशी बोलणे एखाद्यालाच जमते. जीवनातले सोबती म्हणून झाडाकडे पाहिले की संवाद आपोआप जुळत जातो. वृक्षाला पूजावस्तू बनवा की तो ताठ होतो. बोलत नाही. झाडे मोठी मानी असतात. आक्रमक असतातय तुम्ही पुर्ण एकटे असल्याशिवाय ती ढुंकून तुमच्याकडे बघणार नाहीत. आणि या एकटेपणात ती तुमच्यावर पूर्ण स्वामीत्व गाजवल्याख़ेरीज राहणार नाही.

प्रश्न-

76 सुख-दूःखात माणसाला कोण साथ करतात?

77 कोणत्या झाडांचा लळा लेखिकेला फारसा लागत नाही?

78 झाडाशी संवाद केव्हा जुळत जातो?

79 वृक्ष केव्हा ताठ होतो?

80 उताऱ्यास योग्य शार्षक द्या.

81 खालील मुद्द्यांच्या आधारे पत्र लिहा. 5

तुम्ही गिरीश /गिरिजा शेटगांवकर आहात. तुमचा पत्ता दूर्गा निवास मोरजी - गोवा असा आहे. तुम्ही तुमचा मित्र / मैत्रीणीला मे महिन्याच्या सुट्टीत तुमच्या घरी रहायला येण्याचे आमंत्रण देणारे पत्र पुढिल मुद्द्यांच्या आधारे लिहा.

- समुद्र किनाऱ्यावर फिरायला जाणे..
- आंबे, बेरी काजू काढायला जाणे
- फिरायला कोण कोण येणार आहेत.